98LL0/L3

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी)**

जा.क्र प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/११-१२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :
26 JUL 2011

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषयः सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भः १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/ प्र.क्र.६७९/प्राशि-३, दिनाक २० ऑगष्ट २००९.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.शिऊसं/प्राशि ३/नखाप्राशा/पुवि-०९ २९६००-३ दिनांक २/१२/२००९.
३. आपले पत्र क्र. जि.प./शिक्षण/प्राथ/खा.प्रा.शा./ /२०११ दिनांक १३/७/२०११

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | खेड तालुका विद्या विकास प्रतिष्ठान, वराळे, ता.खेड, जि.पुणे. | लर्निंग ट्री इंग्लिश मेडिअम स्कूल, वराळे, ता.खेड, जि.पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम,शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीतपरिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

(कु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, --- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,
खेड तालुका विद्या विकास प्रतिष्ठान, वराळे, ता.खेड, जि.पुणे.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/पुवि/२०१८-१९/ ६७७८ दिनांक-

20 SEP 2019

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे

**विषय-** राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ-** १. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१९/प्र.क्र. १६६/एसएम-५, दि. २९.१०.२०१८
२. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१९/प्र.क्र. १७२/एसएम-५, दि. २८.०२.२०१९

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना खालील विवरणात दर्शविल्याप्रमाणे इ ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | लर्निंग ट्री इंग्लिश मिडियम स्कूल वराळे, ता. खेड, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| २. | राजर्षी शाहु विद्या मंदिर, आंबेगांव बु. पुणे | मराठी | इयत्ता ८ वी | २०१८-१९ |

**अटी व शर्ती :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
२. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
३. सदर वर्गास विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. पुणे यांनी करावी.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(प्रविण अहिरे)
प्र शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत :**
मुख्याध्यापक, लर्निंग ट्री इंग्लिश मिडियम स्कूल वराळे, ता. खेड, जि. पुणे
मुख्याध्यापक, राजर्षी शाहु विद्या मंदिर, आंबेगांव बु. पुणे

तात्काळ
कालमर्यादित

जा.क्र. शिउसं/माध्य-३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९ /६३६५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 30 AUG 2019

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव, खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता.खेड जि. पुणे**

**विषय : सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत.**
**खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता.खेड जि. पुणे**
**संचलित लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे**

संदर्भ : **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र. ३५९/एसएम-२, दिनांक २७.६.२०१९**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भीय शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| पुणे | **खेड तालुका विद्याविकास प्रतिष्ठाण, वराळे ता.खेड जि. पुणे** | **लर्निंग ट्री इंग्लिश मिडीअम स्कूल, वराळे ता.खेड जि.पुणे** | इंग्रजी | **दर्जावाढ (राज्य मंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर** | उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक इयत्ता ९ वी ते १० वी | २०१९-२०२० |

**अटी व शर्ती :-**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी **शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०** पासून असेल.

४. शैक्षणिक वर्ष सन **२०१९-२०२०** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५. परवानगी मिळालेपासून **१८ (अठरा) महिन्याच्या** आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रददबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (२०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरिता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र दर्जावाढ परवानगी प्राप्त इंग्रजी माध्यम शाळा** असे दर्शविणारा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमाक ०३ परिशिष्ट ०२ मधील विहित नमून्यात **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.

१०. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार नाहरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविणेसाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.

११. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE (Unified District Information System for Education ) मध्ये माहिती भरतांना **'स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा'** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करणे आवश्यक राहील.

१२. शासनाचे सद्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(मिनाक्षी राऊत)
**प्र.शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
प्रत : माहितीसाठी सविनय सादरं
१. मा.उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे